सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार

क्र.रामाआ/तक्रार/१३५/२०२५/नंदुरबार

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री विशाल प्रकाश खलाणे.<br>९. दुर्वांकुर, गोरक्षनगर, दिंडोरी रोड,<br>नाशिक ४२२ ००४, | सहाय्यक लेखाधिकारी,<br>लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>नंदुरबार, ता. जि. नंदुरबार-४२५ ४१२. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक सत्यमेव जयते

सुनावणी दिनांक-१८/०२/२०२६

तक्रारदार यांनी दि.११/०४/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "आपण दि १०/०३/२०२५ रोजी जावक क्र. १८८३ नुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखाधिकारी, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार यांना सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देण्यास आदेशित केले आहे.परंतु महोदय, आज आपल्या आदेशास एक महिना उलटून गेल्यानंतरदेखील मला माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. सदर माहिती हेतुपुरस्सर उपलब्ध न करून देण्याचा प्रयत्न होत आहे. कारण येथे शासकीय निधीचा अपहार झाला आहे. तरी याबाबत आपण कठोर कार्यवाही करावी व जन माहिती अधिकारी यांना जास्तीतजास्त दंड अकरावा व मला माहिती उपलब्ध करून देण्यास बाध्य अकरावे ही विनंती." असे नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८(१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०२/२०२६रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते तर तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२७/०९/२०२३ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*" आदिवासी / अवघड क्षेत्रात कार्य करत असल्याबद्दल, सध्या दिला जात असलेला प्रोत्साहन भत्ता /tribal allowance (वर्ग १ ते ४ ची रक्कम नमूद करावी) बाबत माहिती. (२) सदर (सध्या) दिला जात असलेला भत्ता ज्या दिनांकपासून लागू झाला / दिला जात आहे त्या बाबत माहिती. (३) सदर भत्ता ज्या शासन निर्णयानुसार अथवा स्थानिक परिपत्रकानुसार दिला जातो त्याची प्रमाणीत प्रत मिळावी."*

४. आयोगाने व्दीतीय अपील क्र.२०९/२०२४/नंदुरबार संदर्भात आयोगासमोर दिनांक १३/०६/२०२४ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १०/०३/२०२५ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*" विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखाधिकारी, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे."*

५.        सुनावणीपूर्वी जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी दिनांक २३/०५/२०२५ अन्वये अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, द्वितीय अपिल क्र. २०९/२०२४/नंदुरबार वर राज्य माहिती आयोग,खंडपीठ नाशिक यांच्याकडून आदेश परित झालेले आहेत हे माहिती होताच पारित आदेशाची प्रत संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेतल्यानंतर मा.राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांनी दिलेल्या आदेशानुसार अपीलार्थीस त्यांच्या दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात या कार्यालयाकडे उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य या कार्यालयाचे पत्र जा.क्र. लेखा/कक्ष-६/ई-१/कावि/१३८/२०२५ दिनांक २२/०५/२०२५ अन्वये तातडीने पाठविण्यात आलेली आहे. महोदय नम्रपणे नमुद करु इच्छितो की, पारीत केलेला आपल्याकडील आदेश न मिळाल्यामुळेच माहिती आपल्या आदेशानुसार देण्यास विलंब झालेला आहे. तक्रारी संदर्भातील पत्र प्राप्त होताच अपीलकर्ता यांना उपलब्ध ती सर्व माहिती लगेच उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबत हेतुपुरस्करपणे माहिती न देणे बाबत कोणताही हेतु या कार्यालयाचा नाही. अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाव्दारे पाठविलेल्या माहितीची प्रत व पोस्ट ऑफीसकडील रजिस्टर पोस्ट पाठविल्याची पावतीची प्रत माहितीस्तव सादर करीत आहे. तसेच या कार्यालयाच्या ई-मेलव्दारे दि.२३.०५.२०२५ रोजी श्री. खलाणे यांच्या वैयक्तीक ई-मेल आयडीवर माहितीची प्रत सुध्दा पाठविण्यात आलेली आहे. ई-मेल पाठविल्याची प्रत सोबत सादर करीत आहे.

६.        सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने व्दीतीय अपील क्र.२०९/२०२४/नंदुरबार संदर्भात  दिनांक १०/०३/२०२५ अन्वये पारीत केलेले आदेश संबंधित प्राधिकरणांस प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा **सहाय्यक लेखाधिकारी, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार** यांनी तक्रारदार यांना दिनांक २२/०५/२०२५ अन्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. आयोगाने व्दीतीय अपील क्र.२०९/२०२४/नंदुरबार संदर्भात आयोगाने पारीत केलेले आदेश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाले नसल्याने त्यांनी तक्रारदार यांना उशीराने/विलंबाने माहिती पुरविल्याचे दिसून येते.यात  तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याचे दिसून येते. तसेच, प्रत्यक्ष सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काहीही सिध्द न केल्याने सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

**तसेच,** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमूद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner –Vs- State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत थेट माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तूत तक्रार क्र. **१३५/२०२५/नंदुरबार** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2000                                        जावक दि. 20 APR 2026